क्र.२/नसवि/महासभा ०४ /२०१६-२०१७
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २२ ऑग , २०१६

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०४ /२०१६-२०१७

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ------------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक ०१/०९/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

### परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१९/०७/२०१६ रोजीच्या सभेचे कायवृन वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे
   अ) दु:खवटयाचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) अन्वये निवृत्त होणाऱ्या स्थायी समितीच्या आठ सदस्यांच्या जागी अधिनियमातील कलम २० (५) अन्वये तात्विक संख्याबळानुसार नामनिर्देशनाने सदस्य नियुक्ती करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.२९/०७/२०१६ चे विषयपत्र.**

५. महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक १९/०३/२०१० शासन निर्णय व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे दिनांक २९/१०/२०१५ चे परिपत्रकानुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत नळ जोडण्याचा आढावा घेवुन त्यावर नियमानुसार कारवाई करुन अनधिकृत पाणी कनेक्शन नियमित करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२६/०५/२०१६ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "सर्वांसाठी घरे २०२२" ही केंद्रशासनाची योजना दि.०९/१२/२०१५ रोजीच्या शासननिर्णया द्वारे लागु करण्यास व त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास धोरणात्मक निर्णय घेणेबाबत **उपायुक्त (नादानिक विभाग) यांचे दि.१८/०५/२०१६ चे विषयपत्र.**

७. सांगली येथील सर्व्हे नं.४४२/२ ब पैकी रेखांकनातील अंतर्गत रस्त्यास संरक्षक भिंत बांधणेस विश्वास सहकारी गृह निर्माण संस्थेस परवानगी देणेबाबत **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२५/०५/२०१६ चे विषयपत्र.**

८. कुपवाड सर्व्हे नं.२९७/१ मधील प्रारुप कलम ३१ (१) नुसार मंजूर झालेल्या ९.० मी. द. + उ. रस्ता हा कलम ३७ खाली फेरबदल होऊन सर्व्हे नं.२९७/१ मधुन ४.५० मी. व सर्व्हे नं.३०५ मधुन ४.५० मी. असा होऊन मिळणेबाबत कलम ३७ अन्वये सुचना हरकती मागवून मा.शासनास रस्त्याच्या फेरबदलाबाबत प्रस्ताव सादर करणेस धोरणात्मक निर्णय घेणेबाबत **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१२/०७/२०१६ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिकेतील ६ सेवा निवृत्त अभियंते यांना शासनाकडील वेतन श्रेणी प्रमाणे सुधारित वेतन श्रेणी लागु करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) अन्वये मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१६/०७/२०१६ चे विषयपत्र.**

१०. राष्ट्रीय नदि कृत योजने अंतर्गत धुळगांव योजनेतील आवश्यक कामे पुर्ण करुन योजना पुर्ण क्षेमतेने कार्यान्वीत करुन पुढील ३ वर्षासाठी दैनंदिन देखभाल दुरुस्ती मजीप्राचे अधिपत्याखाली होणेबाबत व सुस्थितीमधील योजना हस्तांतरीत करणेबाबत **उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.१३/०६/२०१६ चे विषयपत्र.**

११. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१२. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०४/२०१६-१७

## महापालिका सभा दिनांक ०१/०९/२०१६ करीता.

गुरुवार दि.०१/०९/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय,सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

**१. मा.खोत संगिता विठ्ठलराव यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील वॉ.क्र.२५ मधील खॉजा नगर, येथील १०० फुटी रोडच्या मेन चौकास **"नूर ए हुसेन"** असे नामकरण करणेस व या नामकरणासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

**२. मा.पाटील प्रशांत पायगोंडा यांनी दिलेला प्रस्ताव :-**

कुपवाड सर्व्हे नं.१९२३ येथील ओपनस्पेस (खुलीजागा) येथे परिसरातील नागरिकांसाठी सुसज्ज असे उद्यान विकसित केले जात आहे. सदर उद्यानामध्ये लहानमुलांसाठी विविध प्रकारची खेळणी, जेष्ठ नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅक इ. सुविधा निर्माण केल्या जात आहेत. सदर परिसरातील नागरिकांनी मनपाकडून विकसित होत असलेल्या उद्यानास माजी मंत्री स्व.मदनभाऊ पाटील यांच्या कार्याची आठवण म्हणून उद्यानास **"माजी मंत्री स्व.मदनभाऊ पाटील बालोद्यान"** असे नामकरण करणेबाबत मागणी केली आहे. सदर विषयावर चर्चा होवून मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

**३. मा.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव :-**

केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत सप्टेंबर २००६ मध्ये वारणा नदी उद्भव धरुन सांगली व कुपवाड शहरांसाठी पाणी पुरवठा योजना टप्पा-५/भाग-१ किंमत रु.७९.०२ कोटीच्या योजनेस प्रशासकीय मंजुरी देणेत आली. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ असलेल्या कुपवाड व बानलेसवाडी शहराना स्वत:ची पाणी पुरवठा योजना नसल्याने एम.आय.डी.सी. कडून पाणी घेवून नागरिकांना म.न.पा.मार्फत पुरविण्यात येत होते. त्यामुळे वरील मंजूर योजनेमध्ये तांत्रिक बदल करुन वारणा उद्भव रद्द करुन व सदर रद्द केलेल्या कामाचे ऐवजी कुपवाड शहरातील पाणी पुरवठा योजनेची कामे करण्याबाबत ठराव पारित करण्यात आला व त्यास शासनाची मान्यता घेणेत आली. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवून प्रथम सांगली व कुपवाड शहरासाठी पाणी पुरवठा करणेचे नियोजन केले. त्यामध्ये UIDSSMT योजनेनुसार मंजूर आराखड्यातील वारणा नदी वरील जॅकवेल, पंपींग मशिनरी व सांगली शहरापर्यंत दाब नलिका वगळून अस्तित्वतील कृष्णा नदीवरील हेड वर्कचा उपयोग करून सांगली व कुपवाड शहरातील इतर उपांगाची कामे पूर्ण करून पाणी पुरवठा चालू केला. गेल्या दोन वर्षापासून अपुऱ्या पावसामुळे उन्हाळयामध्ये कृष्णा नदी वारंवार कोरडी पडत आहे. त्यामुळे या कालावधीत सांगली व कुपवाड शहराचा पाणी पुरवठा वारंवार खंडीत होत आहे. त्यामुळे कोयना धरणातून नदीमध्ये पाणी सोडलेनंतर व ते सांगली शहरापर्यंत पोहचेपर्यंत सांगली / कुपवाड मधील नागरिकांचे पाण्यासाठी मोठे हाल होत आहेत. म्हणून पर्यायी व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यासाठी वारणा योजनेतून पाणी घेणे गरजेचे आहे. तसेच अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष होऊन भविष्यात पाण्यासाठी उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तथापि, वारणा नदीस चांदोली धरणातून मुबलक पाणी पुरवठा होत असल्यामुळे सांगली, कुपवाड शहरांना शाश्वत पाणी पुरवठ्यासाठी पुर्वी UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या वारणा उद्भवातून पाणी पुरवठा होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे सांगली व कुपवाड शहरांसाठी वारणा उद्भवातून पाणी उचलण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

त्यामुळे यापुर्वी UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या वारणा नदी उद्भव धरून आखलेल्या योजनेतील वगळलेली कामे शासनाच्या नव्याने पुरस्कृत केलेल्या अमृत योजनेमध्ये समावेश करून सदर योजना तातडीने कार्यान्वित करून सांगली व कुपवाड शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने निकाली काढणेकामी सदर विषयावर चर्चा होवून निर्णय घेऊन मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : २९/०८/२०१६.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ७७

विषय क्रमांक :- ०१

---

मागील सर्वसाधारण महासभा दि.१९/०७/२०१६ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र ४७ ते ठराव क्र.७६ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :

ठराव बहूमताने मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

महासभा लिपिक

7-12-2016

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :-** ०४ दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ७८

विषय क्रमांक :- ०२

---

## दु:खवट्याचा ठराव

स्व.आकारामभाऊ पाटील हे शेतकऱ्यांचे हित जपणारे भाऊ म्हणून ओळखले जात होते. त्याच मुळ गांव पद्माळे १९५० ते १९९० च्या दशकातील पद्मभुषण डॉ.वसंतरावदादा पाटील यांच्या विचारांचा वारसा घेऊन कार्यकर्ते व नेते पदी असा कार्यकाळ राहिला. त्यांचे दि.०६/०८/२०१६ रोजी निधन झाले ते ८६ वर्षांचे होते.

त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा. संतोष शिवदास पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा. रोहिणी सत्यजित पाटील.

प्रशासकीय अधिकारी

2-12-2016

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ७८

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवट्याचा ठराव

रायगड जिल्ह्यातील महाड येथील सावित्री नदीला आलेल्या भिषण पुरामुळे सावित्री नदीवरील ब्रिटीश कालीन पुल कोसळुन ४२ प्रवाशांचे अपघाती दु:खद निधन झाले आहे.

त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा. विक्रम वसंत घाडगे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. शेखर विश्वासराव माने.

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

7-12-2016

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- 10

विषय क्रमांक :- ०२

---

## दु:खवट्याचा ठराव

सांगली,मिरज,कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन्मा.सदस्य श्री.मनगू (आबा) सरगर यांचे नातू स्वप्निल बाबासो घागरे, हे प्रसिध्द वेटलिफ्टर होते. तसेच भारतीय वायू सेना चंदीगड स्टेशन येथे कार्यरत होते. त्यांचे नुकतेच दु:खद निधन झाले.

स्वप्निल बाबासो घागरे यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही महासभा सहभागी होत आहे. त्यांना ही महासभा भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक :- मा. जगन्नाथ बापू ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. गौतम संभाजी पवार

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

7-12-2016

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८१

विषय क्रमांक :- ०२

## दु:खवटयाचा ठराव

पत्रकार रावसाहेब हजारे यांचे वडील बाबु आबा हजारे रा.कुकटोळी, ता.कवठेमहंकाळ, जि.सांगली यांचे दि.२४ जुलै, २०१६ रोजी दु:खद निधन झाले.

बाबु आबा हजारे यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही महासभा सहभागी होत आहे. त्यांना ही महासभा भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक :- मा. जगन्नाथ बापू ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. गौतम संभाजी पवार

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

7.12.2016

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८२

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सध्या सुरु असलेल्या २०१६ ऑलंपीक गेम्स् मध्ये भारताची महिला कुस्ती मल्ल कु.साक्षी मलीक हिने फ्री-स्टाईल कुस्ती प्रकारात किर्गिस्तानच्या आयसुली टिनिकोव्हला हीला नमवत कांस्य पदकाची कमाई करीत भारताला २०१६ ऑलंपीक गेम्समध्ये पहिले पदक मिळवुन देत देशाची पहिली पदक विजेती महिला कुस्ती मल्ल होण्याचा बहुमान पटकावला तसेच, बॅडमिंटन या खेळ प्रकारात कु.पी.व्ही.सिंधू हीने स्पेनच्या जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असणाऱ्या कॅरोलिना मरिन या खेळाडूला कडवी झुंज देत रौप्य पदकाची कमाई करीत भारतीय इतीहासातील सर्वात कमी वयाची ऑलंपीक गेम्स् पदकविजेती होण्याचा बहुमान मिळविला त्याच बरोबर जिमनॅस्टीक खेळ प्रकारातील पहिली भारतीय खेळाडू कु.दिपा कर्माकर व महाराष्ट्राची धावपट्टू ललीता बाबर यांनी अंतिम फेरी गाठली त्यांच्या या ऐतीहासिक कामगिरीबद्दल तसेच, २०१६ ऑलंपीक गेम्स् मध्ये सहभागी झालेल्या सर्व भारतीय खेळाडूंचे सांगली,मिरज,कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही महासभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा. विजय वसंत घाडगे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. शेखर विश्वासराव माने

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

2016

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८३

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

मा.आयुक्त यांनी, पाणी पट्टी व घरपट्टीच्या व इतर विभागांच्या थकबाकी वसूली करीता केलेल्या उपाय योजना मुळे, तसेच मा.आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली थकबाकी वसूली करणेकरीता अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामामुळे मागील थकबाकी मोठ्या प्रमाणात वसूली झाली आहे. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीत भर पडली आहे.

त्या बद्दल ही महासभा मा.आयुक्त यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा. मनगू (आबा) केरू सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. शेडजी सुबराव मोहिते

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

7-12-2016

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८४

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

सांगलीचे नामांकित पैलवान हरप्रितसिंग बाजावा उर्फ गोल्डनसिंग यांना केंद्र शासनाच्या कै.धानचंद (क्रिडा कुशल) पुरस्कार प्राप्त झाला आहे. पंजाब राज्यातून कुस्ती कलेचे ज्ञान मिळविणेसाठी सांगलीमध्ये येवून, स्थायीक झालेले व आपले संपूर्ण जिवन परिवारासहीत सांगली शहरामध्ये रहिवासी झालेल्या पै.गोल्डनसिंग यांच्या या यशाचे सांगली,मिरज,कुपवाडशहर महानगरपालिका क्षेत्रास क्रिडा क्षेत्रातील एक खेळाडूचा गौरवास्पद पुरस्कार प्राप्त झाला आहे.

त्याबद्दल ही महासभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा. पै.गौतम संभाजी पवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा. पै.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

प्रशासकीय अधिकारी

7-12-2016

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८५

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सांगली, मिरज,कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थी न्यायाधिश अमृता पाटील, न्यायाधिश समिना खान तसेच न्यायाधिश इंद्रजित कोळी या विद्यार्थ्यांनी न्यायाधिश पदाच्या परिक्षामधून अतिउच्च यश संपादन करुन, सांगली,मिरज,कुपवाड शहराचे तसेच सांगली जिल्ह्याचा मान उंचविला आहे. अत्यंत खडतर परिस्थितीतून स्वकष्टाने अति महत्वाच्या पदावर नियुक्तीस पात्र होणे हे असाधारण यश आहे.

याबद्दल ही महासभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा. पै.गोतम संभाजी पवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा. जगन्नाथ बापू ठोकळे

प्रशासकीय अधिकारी

7.12.2016

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८६

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.२९/०७/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (३) अन्वये दि.०१/०९/२०१६ रोजी दुपारी निवृत्त होणाऱ्या स्थायी समितीच्या ८ सदस्यांचे जागी अधिनियमातील कलम २० (५) अन्वये तौलनीक संख्याबळानुसार स्थायी समितीवर नामनिर्देशनाने सदस्य नियुक्ती करणेकामी मा.महापौर यांचेकडे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सभागृह नेते श्री.किशोर जामदार , विरोधी पक्ष नेते श्री.दिग्विजय सुर्यवंशी व स्वाभिमानी विकास आघाडीचे गट नेते श्री.शिवराज बोळाज यांनी त्यांचे तौलनिक संख्याबळानुसार त्यांचे कोट्यातील रिक्त झालेल्या जागांवर सदस्य नामनिर्देशन करण्यासाठीचे बंद लिफाफे सादर केले. सदर प्रक्रिया सुरु असताना स्वभिमानी विकास आघाडीचे सदस्य श्री.युवराज बावडेकर व कु.स्वरदा केळकर यांनी स्वाभिमानी विकास आघाडीची मान्यता राज्य निवडणूक आयोगाने रद्द केली असून, निवडणूक आयोगाचा अंतिम निर्णय येई पर्यंत स्वाभिमानी विकास आघाडीचे सदस्य निवडू नयेत दोन सदस्य नियुक्ती स्थगीत ठेवावी अशी मागणी केली. त्यावर सभागृहामध्ये चर्चा झाली. झाले चर्चे नुसार मा.महापौर यांनी स्वाभिमानी विकास आघाडीचे दोन सदस्यांची नावे जाहिर करणे बाबत कायदेशीर अभिप्राय घ्यावा लागेल तसेच , राज्य निवडणूक आयोगाने दि.३० सप्टेंबर, पर्यंत स्वाभिमानी विकास आघाडीला मुदत दिलेली असलेने, दि.३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत स्वाभिमानी विकास आघाडीच्या सदस्य नामनिर्देशनाचा विषय प्रलंबित ठेवणेत येत आलेचे घोषीत करुन, उर्वरीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पक्ष या दोन पक्षाचे नामनिर्देशनाचे लिफाफे उघडून खालील प्रमाणे स्थायी समितीवरील नामनिर्देशीत सदस्यांची नांवे घोषीत केली.

१) मा.दिलीप तुकाराम पाटील :- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष

२) मा.अतहर इद्रिस नायकवडी :- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष

३) मा.बसवेश्वर आनंदराव सातपुते :- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष

४) मा.प्रियांका सुरेश बंडगर :- नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पक्ष

५) मा.प्रार्थना प्रसाद मदभावीकर :- नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पक्ष

६) मा.संगिता अभिजीत हारगे :- नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पक्ष

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महासभा लिपीक

7-12-2016

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

अनमोदक :-

महापौर.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८७

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२६/०५/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक.१९/०३/२०१० शासन निर्णय व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे दिनांक २९/१०/२०१५ चे परिपत्रकानुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत नळ जोडण्याचा आढावा घेवुन त्यावर नियमानुसार कारवाई करुन अनाधिकृत पाणी कनेक्शन नियमित करणेबाबतच्या प्रस्तुत प्रस्तावनुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत नळ जोडण्या नियमित करण्याची मोहिम प्रशासनाने मा.शासनाच्या उपरोक्त शासन निर्णयानुसार तातडीने सुरु करणेस व शासनाचे संदर्भिय शासन निर्णयानुसार देण्यात आलेल्या सुचनांनुसार कार्यवाही ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच, अनाधिकृत पाणी कनेक्शन अधिकृत करणेसाठी खालील प्रमाणे शुल्क आकारणेत यावे असे ही सभा आदेशीत करीत आहे.

| | नियमितीकरण शुल्क | दंडनीय शुल्क | विशेष जोडणी शुल्क | नळ जोडणी शुल्क |
|---|---|---|---|---|
| अनाधिकृत नळ जोडण्या योग्य पाईप लाईन मधून घेतले असल्यास | रु.३०००/- | नळ कनेक्शन घेतलेल्या तारखेपासून सरासरी बिलाची आकारणी | - | नळ जोडणी मापाप्रमाणे आकारणी |
| अनाधिकृत नळ जोडण्या अयोग्य पाईप लाईनमधून घेतले असल्यास | रु.५०००/- | नळ कनेक्शन घेतलेल्या तारखेपासून सरासरी बिलाची दुप्पट आकारणी | रु.२५००/- | नळ जोडणी मापाप्रमाणे दुप्पट आकारणी |

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८८

विषय क्रमांक :- ०६

---

सोबतचे उपायुक्त (नादानिक विभाग) यांचे दि.१८/०५/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत **"सर्वांसाठी घरे २०२२"** ही केंद्रशासनाची योजना दि.०९/१२/२०१५ रोजीच्या शासन निर्णया द्वारे लागु करण्यास व त्याबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणे बाबतच्या प्रस्तुत प्रस्तावानुसार महापालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत **"सर्वांसाठी घरे २०२२"** ही योजना लागु करण्यास ही सभा मान्यता देत असून, सदर योजनेत लाभार्थी निश्चितीसाठी सर्व्हेक्षण करुन त्याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन महासभेच्या अंतीम मान्यतेनंतर मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सदर सर्व्हेक्षण व प्रकल्प अहवाल तयार करणेचा खर्च याकामी मा.शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून करणेस ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

अनुमोदक :- [signature]

नगर अभियंता
(श. ना. दा. नि. कक्ष)

[signature] 7.12.2016
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८९

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२५/०५/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली येथील सर्व्हे नं.४४२/२ ब पैकी रेखांकनातील अंतर्गत रस्त्यास संरक्षक भिंत बांधणेस सेक्रेटरी, विश्वास सहकारी गृह निर्माण संस्थेस परवानगी देणेबाबच्या प्रस्तावानुसार प्रस्तुत विश्वास सहकारी गृह निर्माण संस्था सांगली यांचे मंजूर रेखांकनातील भुखंड क्र.१०,१४,१८,२० व ३१ या भूखंडाचे समोरील ९ मी. रुंद अंतर्गत रस्त्यास पुर्व हद्दीवर म्हणजे सर्व्हे नं.४४२ व ४४३ च्या लगत जमिनीच्या हद्दीवर स्वखर्चाने संरक्षक भिंत बांधणेस परवानगी देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर.

शहर अभियंता

7-12-2016
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- 90

विषय क्रमांक :- ०८

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१२/०७/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

कुपवाड सर्व्हे नं.२९७/१ मधील प्ररुप कलम ३१ (१) नुसार मंजूर झालेल्या ९.० मी. द. + उ. रस्ता हा कलम ३७ खाली फेरबदल होऊन सर्व्हे नं.२९७/१ मधून ४.५० मी. व सर्व्हे नं.३०५ मधुन ४.५० मी. असा होऊन मिळणेबाबत कलम ३७ अन्वये सुचना व हरकती मागवून मा.शासनास रस्त्याच्या फेरबदलाबाबत प्रस्ताव सादर करणेबाबतच्या प्रस्तुत प्रस्तावनुसार प्रारुप कलम ३१ (१) नुसार स.नं.२९७/१ या जमिनीमध्ये पश्चिम हद्दीत नियोजीत ९ मीटर दक्षिण + उत्तर रस्ताआहे. त्यानुसार स.नं.२९७/१ मधील भुखंड धारकांनी कलम ३७ खाली मॉडीफिकेशन होऊन सदर रस्ता स.नं.२९७/१ मधून ४.५० मी. व स.नं.३०५ मधून ४.५० मी करणेची विनंती केली आहे. सदर मागणीनुसार उत्तर + दक्षीण ९ मी. रस्ता फेरबदल होऊन स.नं.२९७/१ व स.नं.३०५ मधून प्रस्तावीत केला असून, प्रत्यक्ष जागेवरील बांधकाम बाधीत होत असलेने, उपरोक्त परिस्थितीचा विचार करता, सदर कलम ३१ (१) नुसार द+उ ९ मी. कायम झालेल्या रस्त्याबाबत म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रस्त्याच्या फेरबदला बाबत १ महिन्याच्या मुदतीत सुचना व हरकती मागवुन महासभेचा अंतीम ठराव करुन मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे

महापालिकेच्या मिरज येथील आरक्षण क्र.५३६ व्यायाम शाळाचे व आरक्षण क्र.५०४ पार्किंग व रस्त्याचे आरक्षण रद्द होवून, रहिवास क्षेत्रात समावेश करणेस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये फेरबदल होवून रहिवास विभागामध्ये समाविष्ठ करणेकामी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

महानगरपालिकेच्या स.नं.२९७/१ मधील प्रारुप कलम ३१(१) नुसार मंजूर झालेल्या ९.०मी.द.+उ. रस्ता हा कलम ३७ खाली फेरबदल होवून स.नं.२९७/१ मधून ४.५० मी. व स.नं.३०५ मधून ४.५० मी.. असा होवून मिळणेबाबत कलम ३७ अन्वये सुचना हरकती मागवून मा.शासनास रस्त्याच्या फेरबदलाबाबत प्रस्ताव सादर करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी प्रस्ताव दाखल झालेला आहे. त्यास अनुसरुन मिरज येथील स.नं.१११,१२६,१२७ व १२८ या जमिनीचे क्षेत्र मनपाच्या मंजूर विकास योजनेतून ग्रीन झोन (शेतीचे क्षेत्र) उक्त सर्व्हे नंबर व लगत असणारे स.नं.११२,१२५, १३६,१७४,१७५ चे क्षेत्र रहिवास विभागात सदरच्या मिळकती असल्याने त्या महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये फेरबदल होवून रहिवास विभागामध्ये समाविष्ठ करणेकामी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. ज्ञानेश्वर [illegible] ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर.

अनुमोदक :- सौ. जरीना [illegible]

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०१/२०१६

ठराव क्रमांक :- ९१

विषय क्रमांक :- ०९

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१६/०७/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेतील ६ सेवा निवृत्त अभियंते यांना शासनाकडील वेतन श्रेणी प्रमाणे सुधारित वेतन श्रेणी लागु करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) अन्वये मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबतच्या प्रस्तुत प्रस्तावानुसार महापालिकेचे सेवा निवृत्त अभियंते श्री.एस.बी.मुळे, श्री.आर.केळकर, श्री.डी.ए.बेलवलकर, श्री.टी.बी.वाडकर, यांना शासनाचे अधिसुचनेनुसार दि.०१/०१/१९८६ पासून २०००-३५०० ऐवजी रु.२२००-४००० अशी सुधारीत वेतन श्रेणी तसेच, श्री.के.एन.इचलकरंजे यांना १९८६ पासून २०००-३५०० निश्चित करुन सन १९९६ मध्ये पदोन्नती मिळाल्या पासून रु.२२००-४००० तसेच श्री.आर.जी. नायानी यांना १/१/१९८६ पासून २०००-३५०० निश्चित करुन व १९९८ मध्ये पदोन्नती मिळाल्या पासून २२००-४००० अशी सुधारीत वेतन श्रेणी निश्चिती करुन मागील कोणताही आर्थिक लाभ प्रत्यक्षात न देता केवळ वेतन निश्चिती त्या त्या दिनांकापासून करुन त्यानुसार वेतन श्रेणी लागु करणेस मा.शासनाची मान्यता मिळणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) अन्वये मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

प्रस्तुतविषयाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली उपसूचना दाखल करुन घेऊन ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

उपरोक्त सेवा निवृत्त अभियंत यांचप्रमाणे महापालिकेचे सेवा निवृत्त अभियंते श्री.पी.व्ही.माने , श्री.सि.जी.सोनवणे व श्री. एस.बी.कमलेकर या सेवा निवृत्त अभियंत्यांनाही उपरोक्त प्रमाणे लाभ मिळणेबाबत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक :-

महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८२

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.१३/०६/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

राष्ट्रीय नदि कृत योजने अंतर्गत धुळगांव योजनेतील आवश्यक कामे पुर्ण करुन योजना पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत करून पुढील ३ वर्षासाठी दैनंदिन देखभाल दुरुस्ती मजीप्राचे अधिपत्याखाली होणेबाबत व सुस्थितीमधील योजना हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्तुतचा प्रस्ताव ही सभा प्रलंबित ठेवित आहे.

सूचक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक महापौर.

कार्यकारि अभियंता (जलनि.)

७-१२-२०१६

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ९४

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पाटील प्रशांत पायगोंडा यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड सर्व्हे नं.१९२३ येथील ओपनस्पेस (खुलीजागा) येथे परिसरातील नागरिकांसाठी सुसज्ज असे उद्यान विकसित केले जात आहे. सदर उद्यानामध्ये लहानमुलांसाठी विविध प्रकारची खेळणी, जेष्ठ नागरिकांसाठी वॉकिंग टॅक इ. सुविधा निर्माण केल्या जात आहेत. सदर परिसरातील नागरिकांनी मनपाकडून विकसित होत असलेल्या उद्यानास माजी मंत्री स्व.मदनभाऊ पाटील यांच्या कार्याची आठवण म्हणून उद्यानास **"माजी मंत्री स्व.मदनभाऊ पाटील बालोद्यान"** असे नामकरण करणेबाबत मागणी केलेली आहे. त्यास ही सभा सहमती दर्शवित असून, सदर उद्यानास **"माजी मंत्री स्व.मदनभाऊ पाटील बालोद्यान"** असे नामकरण करणेकामी महापालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार सूचना व हरकती मागविणेस व या नामकरणासाठी प्रसिध्दीसह येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

मा०मन्ना व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ९३

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन. महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या खोत संगिता विठ्ठलराव यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील वॉ.क्र.२५ मधील खॉजा नगर, येथील १०० फुटी रोडच्या मेन चौकास **"नूर ए हुसेन"** असे नामकरण करणेस महापालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार सूचना व हरकती मागविणेस व या नामकरणासाठी प्रसिध्दीसह येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature]

[signature]
महापौर,

मा.व्यवस्थापक

[signature] 12-2016
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- ०१/०९/२०१६

ठराव क्रमांक :- ८५

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत सप्टेंबर २००६ मध्ये वारणा नदी उद्भव धरुन सांगली व कुपवाड शहरांसाठी पाणी पुरवठा योजना टप्पा-५/भाग-१ किंमत रु.७९.०२ कोटीच्या योजनेस प्रशासकीय मंजुरी देणेत आली. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकामध्ये समाविष्ठ असलेल्या कुपवाड व वानलेसवाडी शहराना स्वत:ची पाणी पुरवठा योजना नसल्याने एम.आय.डी.सी. कडून पाणी घेवून नागरिकांना म.न.पा.मार्फत पुरविण्यात येत होते. त्यामुळे वरील मंजूर योजनेमध्ये तांत्रिक बदल करुन वारणा उद्भव रद्द करुन व सदर रद्द केलेल्या कामाचे ऐवजी कुपवाड शहरातील पाणी पुरवठा योजनेची कामे करण्याबाबत ठराव पारित करण्यात आला व त्यास शासनाची मान्यता घेणेत आली. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवून प्रथम सांगली व कुपवाड शहरांसाठी पाणी पुरवठा करणेचे नियोजन केले. त्यामध्ये UIDSSMT योजनेनुसार मंजूर आराखड्यातील वारणा नदी वरील जॅकवेल, पंपींग मशिनरी व सांगली शहरापर्यंत दाब नलिका वगळून अस्तित्वतील कृष्णा नदीवरील हेड वर्कचा उपयोग करून सांगली व कुपवाड शहरातील इतर उपांगाची कामे पूर्ण करून पाणी पुरवठा चालू केला. गेल्या दोन वर्षापासून अपुऱ्या पावसामुळे उन्हाळ्यामध्ये कृष्णा नदी वारंवार कोरडी पडत आहे. त्यामुळे या कालावधीत सांगली व कुपवाड शहराचा पाणी पुरवठा वारंवार खंडीत होत आहे. त्यामुळे कोयना धरणातून नदीमध्ये पाणी सोडलेनंतर व ते सांगली शहरापर्यंत पोहचेपर्यंत सांगली / कुपवाड मधील नागरिकांचे पाण्यासाठी मोठे हाल होत आहेत. म्हणून पर्यायी व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यासाठी वारणा योजनेतून पाणी घेणे गरजेचे आहे. तसेच अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे नागरिकामध्ये असंतोष होऊन भविष्यात पाण्यासाठी उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तथापि, सांगली, कुपवाड शहरांना शाश्वत पाणी पुरवठा करणे अत्यंत आवश्यक असल्याने हरिपूर येथे कृष्णा नदीचा संगमातील पात्रमध्ये पाणी बारमाही असल्यामुळे सांगली व कुपवाड शहराला पाणी पुरवठा करणेसाठी हरिपूर येथील नदीपात्रातून पाणी उचलण्यासाठी मा.शासनाकडे UIDSSMT योजनेंतर्गत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

सबब, UIDSSMT योजनेंतर्गत हरिपूर संगमातील नदीपात्रातून पाणी उपसा योजना तयार करुन, शासनाच्या नव्याने पुरस्कृत केलेल्या अमृत योजनेमध्ये समावेश करून सदर योजना तातडीने कार्यान्वित करणेसाठी अनुषंगिक नकाशे, खर्चाचे अंदाजपत्रक, डी.पी.आर. तयार करणेची जरुरी ती कार्यवाही प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

कार्यकारी अभियंता
पा.पु.विभाग
सूचक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका
अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर.